प्रेसनोट दि २६/०७/२०१७

# गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाने कल्याणीनगर परिसरात वेश्याव्यवसाय करणा-या २ महिलांना अटक

दि २५/०७/२०१७ रोजी सायंकाळी १६.१५ वा चे सुमारास दरोडा प्रतिबंधक पथकाचे पोलीस नाईक/६६१३ विल्सन डिसोजा यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कल्याणीनगर कुमार सोसायटी बंगला नंबर सी.एल-४/८ या ठिकाणी दोन महिला नामे शबनाज मिना व कोमल चावला यां दोघी काही मुलीकडुन अनैतिक व्यवसाय करुन घेत असलेबाबत बातमीदारामार्फत बातमी मिळालेने सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंद महाजन येरावडा पोलीस स्टेशन यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे श्री सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाखाली बातमीची सत्यता पडताळणी करीता एक बनावट ग्राहक बनवून त्यास बातमीचे ठिकाणी कल्याणीनगर कुमार सोसायटी बंगला नंबर सी.एल-४/८ येथे पाठविले असता, सदर ठिकाणी दोन महिला अनैतिक व्यवसायकरीत असल्याची खात्री झाल्याने त्याठिकाणी पोलीस पथकाने पंचासह जावून दि. २५/०७/२०१७ रोजी १७/२० वा. छापा टाकला असताना तेथे महिला नामे शबनाज अल्ताफ मिना वय २८ वर्षे रा.घायरी रायकर नगर व कोमल राजकुमार चावला वय ३१ वर्षे रा. कल्याणीनगर कुमार सोसायटी बंगला नंबर सी.एल-४/८ पुणे यांना अटक करण्यात आलेली आहे. त्यांचा फरारी साथीदार नामे विपुल रॉय पुर्ण नाव पत्ता माहित नाही याचे मदतीने वरील आरोपी महिला या तिन पिडीत महिलांकडून अनैतिक वेश्या व्यवसाय करुन घेत असताना रोख रु.१,१३,४०० /-रु.व कि.रु.६,००,०००/-ची आय-टेन कार नं.एम.एच./१४/सी.एस/७४३८ असा सर्व मिळुन ७,१३,४००/- रु.चे मालासह ताब्यात घेणेत आले आहे. त्यांचेविरुध्द येरवडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं ६३१/२०१६ अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम कलम ३,४, व ५ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त श्री प्रदिप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त श्री.पंकज डहाणे, सपोआ गुन्हे-१, श्री सुरेश भोसले यांचे सूचनेप्रमाणे गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, पोलीस निरीक्षक,वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंद महाजन,पोलीस कर्मचारी यशवंत आंब्रे, विनायक पवार, शंकर पाटील, राहुल घाडगे, बशीर सय्यद, मल्लिकार्जुन स्वामी, सचिन गायकवाड, विल्सन डिसोझा, धनाजी पाटील, महिला पोलीस कर्मचारी जगताप व विसापुरे यांनी केली आहे.